# सावित्रीबाई फुले जयंती

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी,राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि नागपुरातील स्त्री संघटना यांच्या संयुक्त विधमाने दिनांक ३/१/२०२२ ला दादासाहेब कुंभारे सभागृह येथे सकाळी ११.३० वा सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ.कमलताई गवई, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.बी.ए.मेहेरे प्रमुख अथिती म्हणून कव्ययेत्री सारिका उबाळे प्रशिक आनंद राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे,डॉ.सरोज आगलावे.कार्यक्रमाचे संचालन प्रा.सरोज डांगे आभार वंदना जीवने यांनी मानले या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ७०विद्यार्थी उपस्थित होते.












महाराष्ट्र टाइम्स नागपूर । गुरुवार, ६ जानेवारी २०२२

## सावित्रीच्या कार्यातून स्वाभिमानाचे बिजारोपण

**डॉ. कमलताई गवई यांचे प्रतिपादन; कर्तृत्ववान महिलांचा सत्कार**

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

महिला विकास मंच, दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालय आणि शहरातील विविध आंबेडकरवादी महिला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कोरेगाव भीमा शौर्य दिन आणि सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कमलताई गवई होत्या. प्रमुख वक्ते म्हणून कवयित्री सारिका उबाळे आणि प्रशिक आनंद यांची उपस्थिती होती.

डॉ. आंबेडकर कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना डॉ. गवई.

सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे बिजारोपण केल्यामुळेच आज स्त्रिया स्वाभिमानाने जगत आहेत, असे याप्रसंगी डॉ. गवई म्हणाल्या. सारिका उबाळे यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेत आजच्या स्त्रीजीवनाचे वास्तव मांडले. सिमॉन दी बोअर यांचा उल्लेख करून त्यांनी विविध अंगाने स्त्री असमानतेचा आढावा घेतला. प्रशिक आनंद यांनी कोरेगाव भीमा शौर्य दिनानिमित्त विचार मांडले. बौद्ध आणि वैदिक संघर्ष हा मरणान्तिक संघर्ष होता असे सांगून १ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या युद्धाचे विश्लेषण केले.

सामाजिक कार्यामध्ये उल्लेखनीय योगदान असलेल्या जेबुन्नीसा शेख, लेखन क्षेत्रात सुजाता लोखंडे, चित्रपट क्षेत्र सांची जीवने, 'जयंती' चित्रपटात भूमिका साकारणाऱ्या विभा गजभिये, क्रीडा क्षेत्रातील आशा मेश्राम, सामाजिक क्षेत्रात कार्यरत शारदा झामरे यांना 'आंबेडकरवादी महिला फोरम पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. भूवनेश्वरी मेहेरे यांचे स्वागतपर भाषण झाले. प्रास्ताविक डॉ. सरोज आगलावे यांनी केले. संचालन प्रा. सरोज डांगे यांनी केले. आभार वंदना जीवने यांनी मानले. या कार्यक्रमात तक्षशीला वाघधरे, छाया खोब्रागडे, डॉ. रवींद्र तिरपुडे, कल्पना मेश्राम आदी उपस्थित होते.